विभाग,
कार्य विभाग
DEC 2021
क्रमांक 5570
महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई

१०८१६०

माहितीचा अधिकार अधिनियम २००५

जोडपत्र 'अ' (नियम ३ पहा)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळवण्यासाठी अर्जाचा नमुना

प्रति,

मा. जनमाहिती अधिकारी
विधी व न्याय खाते
मंत्रालय, मुंबई

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव - ॲड. जयंत आनंदराव कलगुडे

२) पत्ता - एस. २ कमल अपार्टमेंट, ओकरे गल्ली
ब्राम्हणपुरी, मिरज ता. मिरज जि. सांगली
मोबाईल फोन - 9326686509

३) माहितीचा विषय



राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगर-पंचायती मध्ये गेल्या पाच/सहा वर्षापुर्वी नामनियुक्त नगरसेवक पदी किती जणांची नेमणूक झाली व ज्या महानगरपालिका, नगरपरिषदा, ~~पंचायत~~ नगरपंचायती मुदत संपल्याने बरखास्त झाल्या अशा पालिकांच्या माजी नगरसेवकांची संख्या कळविण्यात यावी. सविस्तर सपाशिलप्रमाणे नावांची यादी नको. पालिका नुसार संख्या कळवावी.

४) माहितीचा कालावधी पाच/सहा वर्षे

५) माहिती टपालद्वारे हवी आहे का? — व्यक्तिशः
व्यक्तीशः हवी आहे.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखाली आहे काय ? — नाही

७) माहिती मागविण्याचा हेतु — नगरपालिका कायद्यानुसार वकिलांना नामनियुक्त करण्यात येत नसल्याने त्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करणेकरिता

टपाल केंद्र
म.प्र.सं./वि.व न्याय विभाग
25
21/12

स्थळ : मुंबई

दिनांक 21/12/2021

अर्जदारांची सही
ॲड जयंत आ. कलगुडे

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९४२०८

Email Id-navnath.wath@nic.in

क्रमांक : माअ/संकिर्ण-१३२२/२५/नवि-२८

दिनांक:-3 फेब्रुवारी, २०२२

प्रति,

अॅड.जयंत आनंदराव बलगुडे,
एस-२, कमल अर्पाटमेंट, भोकरेगल्ली,
ब्राम्हणपूरी मिरज, ता.मिरज, जि.सांगली

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स/.प./न/प./ज/.प. मा.अ.
आवक क्र. ०८
दिनांक:- 11 / 02 /2022

**विषय** :माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मिळण्याबाबत.
**संदर्भ:** जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांच्या क्र.माअअ-२०२२/प्र.क्र.०२/ नवि-८, दि.२४.०१.२०२२ च्या पत्रासोबतचा आपला दि.२१.१२.२०२१ चा माहिती अर्ज.

महोदय,

आपला उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन अर्ज या कार्यासनास दि.०१.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. यासंदर्भात आपणास पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे:-

२. आपल्या संदर्भाधीन माहिती अर्जामधील उक्त मुद्यामध्ये मागविलेली माहिती या कार्यासनात उपलब्ध नाही. सदर माहिती आपणास या कार्यासनाच्या अखत्यारीतील नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याशी संबंधित आहे. यास्तव, आपल्या माहिती अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका, जन माहिती अधिकारी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व जन माहिती अधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे आपणास माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विनंतीसह हस्तांतरीत करण्यात येत आहे. तरी याबाबत आपण त्यांच्याशी संपर्क साधावा, ही विनंती.

आपला,

3/2/2022

(नवनाथ रा. वाठ)
**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**

प्रत,

१. जन माहिती अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका, महानगरपालिका भवन, पामबीच जंक्शन, सेक्टर १५ए, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, जि.ठाणे. यांना अर्जदाराच्या माहिती अर्जाच्या प्रतीसह माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
२. जन माहिती अधिकारी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, शंकरराव चौक, कल्याण (प.), जि.ठाणे यांना अर्जदाराच्या माहिती अर्जाच्या प्रतीसह माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
३. जन माहिती अधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) जि.ठाणे ४०१ १०१ यांना अर्जदाराच्या माहिती अर्जाच्या प्रतीसह माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
४. माहितीचा अधिकार निवडनस्ती/नवि-२८

०१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./०८/2022 दिनांक :- १७/२/2022

प्रति,
ॲङ जयंत आनंदराव बलुगडे,
एस.2, कमल अपार्टमेंट, भोकरे गल्ली,
ब्राम्हणपुरी, मिरज, ता. मिरज, जि. सांगली.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
नामनिर्देशित सदस्यांची माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- 1) मा. श्री. नवनाथ रा. वाठ, जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.माअ/संकिर्ण-1322/25/नवि-28, दि. 3/02/2022 रोजीचे पत्र.
2) सोबत :- आपणांकडील दि. 21/12/2021 रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

मा. श्री. नवनाथ रा. वाठ, जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भित पत्र क्र. 01 अन्वये आपणांकडील संदर्भित पत्र क्र. 02 ची छायांकित प्रत आपणांस माहिती उपलब्ध करुन देणेकामी या कार्यालयाकडे वर्ग केलेली आहे.

आपणांकडील संदर्भित पत्र 02 चे अवलोकन केले असता आपण महानगरपालिकेतील नामनिर्देशित सदस्यांची संख्या व मुदत संपल्याने बरखास्त झालेल्या महानगरपालिकांच्या नगरसेवकांची संख्येची माहिती मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक माहे ऑगस्ट 2017 मध्ये पार पडलेली असून त्याची मुदत माहे ऑगस्ट 2022 पर्यंत आहे. महानगरपालिका नामनिर्देशित पालिका सदस्यपदी एकुण 05 (पाच) व्यक्तींची नेमणूक करण्यांत आलेली आहे.

उक्त माहिती नगरसचिव विभागात विषयांकित प्रकरणी उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरुन देण्यात आली आहे. सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

भारतीय डाक
EM771353169IN IVR:6977771353
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:3,17/02/2022,12:54
To:ADV JAYANT BALGUDE,MIRAJ
PIN:416410, Miraj H.O
From:MIRA BHAYAN,MUKYA KARYALAYA
Wt:20gms
Amt:41.30(Cash)Tax:6.30
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 18002666868> <Wear Masks, Stay Safe>
India Post

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

दि. १७/२/२०२२ रोजी अर्जदारांस सदरचे पत्र शिघ्र टपालाने पाठविण्यात आले.
१७/२/२०२२